महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर, पुणे व औरंगाबाद येथील वर्ग-२, ३, ४ च्या ३२ अस्थायी पदांना दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ पर्यत मुदतवाढ देण्याबाबत-

महाराष्ट्र शासन,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र. राजस २०१७/ प्र.क्र.३७/ ५ स,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १६ जानेवारी, २०१८

<u>वाचा :-</u> १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.राजस-१००८/ प्र.क्र.५३८/५-स, दि. ५/५/२०११

२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.आस्थापना /कक्ष-१/ सह.न्याया./ अस्थायी पदे/मुदतवाढ/११६/२०१७, दि.३१/०१/२०१७. व क्र.८२१/२०१७, दि.२८/०७/२०१७ व क्र.१४१८, दि.०४/१२/२०१७

३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र.मरासअन्या/ आस्था/ अपमुवा/९२/१७, दि.१०/०१/२०१७. व क्र.१९८८, दि.२२/११/२०१७

४) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.१०/०२/२०१७ व दि.०३/१०/२०१७ व दि.०८/०१/२०१८

५) समक्रमांकाचा शासन निर्णय दि.२२/०२/२०१७ व दि.१०/१०/२०१७.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर, पुणे व औरंगाबाद येथील वर्ग- २, ३, ४ च्या ३२ अस्थायी पदांना दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भादिन क्र.५ येथील शासन निर्णय दि.१०/१०/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. प्रशासकीय कारणास्तव सदरची अस्थायी पदे पुढे चालू ठेवणे आवश्यक असून त्यांना सन २०१७-२०१८ करीता मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. सबब, शासन निर्णय दि.०५/०५/२०११ अन्वये निश्चित केलेल्या आकृतिबंधात उक्त पदांचा समावेश आहे, या अटीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर, पुणे व औरंगाबाद येथील वर्ग- २, ३, ४ च्या ३२ अस्थायी पदांना दि.०१/०१/२०१८ ते २८/०२/२०१८ पर्यत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पदांची विगतवारी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविली आहे.

२. सदरहू पदावर होणारा खर्च "मागणी क्र.व्ही-२, २४२५-सहकार, ००१- संचालन व प्रशासन,(०१) प्रशासन व संचालन, (०१)(०९) महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय (२४२५०१०२)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या लेखाशिर्षाखालील सन २०१७-२०१८ च्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११६१६५४५३१६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Manjiri
Ganeshbhushan Joshi

Digitally signed by Manjiri Ganeshbhushan Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=91b4708db2a52d675f7f30d81444f3844833dfc7c86d4244ee1075c97c713180, serialNumber=7d5731d128ab41d6a090557a2e9658b7382ac03af6e239ba66cc1cf9a6cf2f52, cn=Manjiri Ganeshbhushan Joshi
Date: 2018.01.16 17:02:18 +05'30'

(मं.ग.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई,
३. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (प्रशासन), पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई,
४. सदस्य, महाराष्ट्र सहकारी अपील न्यायालय, खंडपीठ, नागपूर/ पुणे, औरंगाबाद द्वारा प्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई
५. महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),
६. महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),
७. निवासी लेखाधिकारी, मुंबई,
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/पुणे/औरंगाबाद,
१०. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-१२/ वित्तीय सुधारणा,मंत्रालय, मुंबई
११. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, कार्यासन १७-स, १५-स, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती.

शासन निर्णय क्रमांक राजस २०१७/ प्र.क्र.३७/ ५ स, दि. १६ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयातील महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर, पुणे व औरंगाबाद येथील ३२ अस्थायी पदांच्या विगतवारीचे विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	पदांची संख्या
मुंबई (वर्ग-२)			
१	निबंधक	९३००-३४८००	१
(वर्ग-३ व वर्ग-४)			
२	कार्यालय अधिक्षक	९३००-३४८००	१
३	लघुलेखक (निम्नश्रेणी)	९३००-३४८००	२
४	लेखापाल	९३००-३४८००	१
५	शिरस्तेदार	९३००-३४८००	२
६	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२
७	टंकलेखक	५२००-२०२००	१
८	वाहनचालक	५२००-२०२००	१
९	शिपाई	४४४०-७४४०	१
			एकूण १२
नागपूर (वर्ग-३ व वर्ग-४)			
१	लघुलेखक (निम्नश्रेणी)	९३००-३४८००	१
२	शिरस्तेदार	९३००-३४८००	१
३	मुख्य लिपिक	९३००-३४८००	१
४	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२
५	शिपाई	४४४०-७४४०	२
			एकूण ०७
पुणे (वर्ग-३ व वर्ग-४)			
१	लघुलेखक (निम्नश्रेणी)	९३००-३४८००	१
२	शिरस्तेदार	९३००-३४८००	१
३	मुख्य लिपिक	९३००-३४८००	१
४	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	१
५	टंकलेखक	५२००-२०२००	१
६	शिपाई	४४४०-७४४०	२
			एकूण ०७
औरंगाबाद (वर्ग-३ व वर्ग-४)			
१	लघुलेखक (निम्नश्रेणी)	९३००-३४८००	१
२	शिरस्तेदार	९३००-३४८००	१
३	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	१
४	टंकलेखक	५२००-२०२००	१
५	शिपाई	४४४०-७४४०	२
			एकूण ०६
एकूण :- मुंबई १२ + नागपूर ०७ + पुणे ०७ + औरंगाबाद ०६ = ३२			